# दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह

## 1. संस्थेबाबतची माहिती, कार्य, व कर्तव्ये

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 63 (ड) च्या तरतुदीनुसार करमणूकीची सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे स्वविवेकाधिन कर्तव्य आहे. तदनुसार दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह नागरीकांना करमणुकीची सेवा उपलब्ध करुन देतानाच सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याचे कार्य देखील करते.

रास्त दरामध्ये नाट्यगृह उपलब्ध करुन देऊन समाजाची कला व सांस्कृतिक अभिरुची जोपासणे हा नाट्यगृहाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश आहे.

दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे व महापालिकेने स्वत: बांधलेले पहिले बंदिस्त नाट्यगृह आहे. दिनांक 16 जुलै 1978 पासून हे नाट्यगृह कार्यान्वित झाले. मराठी संगीत रंगभूमी वरील श्रेष्ठ अभिनेते तसेच ह्या युगातील चिरंजीव आवाज कै. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ह्या नाट्यगृहाचे " दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह " असे नामकरण करण्यात आले.

संपूर्ण वातानूकुलित असलेल्या या नाट्यगृहाची एकूण आसनक्षमता 916 आहे. अनामत व भाडे शुल्काच्या अनुसूचीत रकमेचा भरणा करुन सदर नाट्यगृहाचे नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम इ. सादर करण्याकरीता आरक्षण करता येते. नाट्यगृहामध्ये एक तालीम कक्ष, एक चर्चासत्र सभागृह, एक बैठक सभागृह उपलब्ध असून विहित अनामत रक्कम व भाडेशुल्काचा आगाऊ भरणा नाट्यगृहाच्या कार्यालयात करुन त्यांचे संबंधित हेतूकरीता आरक्षण करता येते. निमंत्रित / वलयांकीत पाहुणे यांच्या आदरातिथ्याकरिता वातानुकूलीत अतिथी कक्ष तसेच नाट्यसंहिता इ. वाचनाकरीता वाचनालय कक्षाची सुविधा विहित शुल्कावर नाट्यगृहात उपलब्ध आहे. रंगमंचावर आवश्यक असलेले अतिरिक्त नेपथ्य / सामान देखील शुल्कतत्वावर उपलब्ध आहे. नाट्यगृहामध्ये प्रेक्षकांकरीता उपहारगृहाची सुविधा देखील उपलब्ध आहे.

नाट्यगृह प्रभावीपणे कार्यरत राहण्याकरिता जनतेने नियमांचे काटेकोरपणे पालन करुन बृहन्मुंबई महानगरपालिका / नाट्यगृह प्रशासन यांना सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे.

## सेवा प्रदान करण्याकरीता व तक्रार निवारणार्थ उपलब्ध असलेली नियंत्रण यंत्रणा

नाट्यगृहाच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवही उपलब्ध असून प्रशासकीय अधिकारी स्वत: वैयक्तिकरित्या तक्रारी हाताळतात. आवश्यकता भासल्यास संबंधित अधिका-याकडे त्या पाठविण्यात येतात.

# <u>संस्थात्मक संरचना</u>

महानगरपालिका आयुक्त

।

।

अतिरिक्त आयुक्त (पू.उप.)

।

।

उप आयुक्त (आपत्कालिन व्यवस्थापन )

।

।

प्रशासकीय अधिकारी

।

।

सहाय्यक  व्यवस्थापक

।

।

————————————————————————————————

| । | । | । | । | । |
|---|---|---|---|---|
| लिपिक | प्रशितन चालक | विजतंत्री -1 | रंगमंच परिचर | हलालखोर |
| | । | । | | |
| | प्रशितन मदतनीस | तारतंत्री -3 | | |